# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर

गोशाळेतील खोंडे शेतकरी कुटुंबाना पाळावयास देणेबाबत.

१. सदरबाबतची माहिती, अटी व शर्ती आणि अर्जाचा नमुना कार्यालयीन वेळेत गोशाळा विभाग, यमाई तलावाजवळ, पंढरपूर येथे व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळेल.

२. अर्ज इकडील नमुन्यात स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर शेतकऱ्याचे नाव व पूर्ण पत्ता आणि अर्ज खोंडे पाळावयास घेण्यासाठी भरलेला आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. अर्ज दि.१२/०९/२०२४ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. उशिरा आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

३. सदरकामी यापूर्वी केलेले अर्ज व अपूर्ण भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४. अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.

अ. अर्जदाराचे आधारकार्ड / मतदानकार्ड.

ब. अर्जदाराचा शेतीचा ७/१२ व ८अ उतारा.

क. अर्जदाराचे पॅनकार्ड (असल्यास).

५. गोशाळेतील एकूण २४ खोंडे पाळावयास देण्यात येत आहे. त्याचे वय अंदाजे १ ते १.५ वर्षे आहे. सदरची २४ खोंडे, प्राप्त अर्जातून चिट्टीद्वारे गरजू / पात्र शेतकऱ्यांची निवड करून त्यांना खोंडे पाळावयास देण्यात येणार आहेत.

६. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाना प्राधान्य देण्यात येईल. त्यासाठी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील शेतकरी असलेबाबतचा गाव कामगार तलाठी तहसिलदार यांचेकडील दाखला / प्रमाणपत्र किंवा पीएम रिपोर्ट व आत्महत्याग्रस्त शेतकरी म्हणून शासकीय लाभ घेतलेल्या बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक आहे.

७. सदरची गोशाळेतील खोंडे गोशाळा विभाग, यमाई तलावाजवळ, गणेश नगर, पंढरपूर येथे पाहावयास मिळतील.

८. कायमस्वरूपी गोपालनासाठी घेतलेली खोंडे यांची निगा, जोपासना योग्य प्रकारे करण्याची आवश्यकता आहे. तसेच त्यांना मुबलक प्रमाणात खाद्य देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

९. सदरची घेतलली खोंडे कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना विक्री अथवा इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही.

१०. शेतकऱ्याने गोहत्या बंदी कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची पुर्णता खबरदारी घेणे आवश्यक आहे.

११. सदरची घेतलेली खोंडांचे पालन पोषणाचे वेळी त्यांचे पशुखाद्य, चारा, वैरण तसेच वेळोवेळी औषधोपचार इ. मध्ये कोणत्याही प्रकारची हयगय करता येणार नाही.

१२. सदरची खोंडे शेतकऱ्यांना कायमस्वरूपी पाळावयास देण्यात येत असल्याने मंदिर समितीचे पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी केंव्हाही येऊन या खोंडांची पाहणी करतील. त्यावेळी त्यांना खोंडे दाखवणे आवश्यक आहे.

१३. सदरची खोंडे जीवंत असलेबाबत व सुस्थितीत असलेबाबत शेतकऱ्यांला दरवर्षी जुन महिन्यात मंदिर समितीला खोंडाचे फोटोसह लेखी पत्राने कळविणे आवश्यक आहे. तसेच खोंड मयत झाल्यास मंदिर समितीला पीएम रिपोर्टसह तात्काळ कळविणे बंधनकारक राहील.

१४. पालन करण्यासाठी घेतलेल्या खोंडांचे भविष्यात परिस्थितीने पालन करणे शक्य होत नसल्यास ती अन्य गरजु व्यक्तीस हस्तांतर करावयाचे झालेस, मंदिर समितीची पूर्व परवागनी घेणे बंधनकारक राहील.

१५. सदरच्या खोंडांचा वापर फक्त शेतीकामासाठी करणे आवश्यक आहे.

१६. मंदिर समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते शेतकऱ्यास बंधनकारक राहतील.

१७. ज्या शेतकऱ्यांना खोंडे देण्यात येतील त्यांनी सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे साध्या कागदपत्रावर प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१८. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१९. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

———//———

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**अर्ज**

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

| | |
|---|---|
| विषय :— | गोशाळेतील खोंडे मोफत पाळावयास मिळणेबाबत विनंती. |
| पूर्ण नाव :— | श्री.—————————————————————— |
| पूर्ण पत्ता :— | ————————————————————————— |
| | ————————————————————————— |
| मोबाईल क्रं.:— | ————————————————————————— |

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने गोशाळेतील खोंडे मोफत पाळावयास देण्याबाबतच्या दि.०५/०९/२०२४ रोजीचे दैनिक लोकमत, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीरातीप्रमाणे मला माझ्या शेतीकामासाठी खोंड पाळावयास घेणे आवश्यक आहे. त्याबाबत मंदिर समितीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र करून देण्यास तयार आहे. त्यानुसार मला खोंड पाळावयास मिळावे ही, नम्र विनंती आहे.

दिनांक     /     /२०२४          शेतकऱ्याची स्वाक्षरी

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत

अ. अर्जदाराचे आधारकार्ड / मतदानकार्ड.
ब. अर्जदाराचे पॅनकार्ड (असल्यास).
क. अर्जदाराचा शेतीचा ७/१२ व ८अ उतारा.

टिप :— अर्जदार आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील शेतकरी असल्यास गाव कामगार तलाठी / तहसिलदार यांचेकडील दाखला किंवा पीएम रिपोर्ट व आत्महत्याग्रस्त शेतकरी म्हणून शासकीय लाभ घेतलेल्या बॅंक पासबुकची झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक आहे.